**रे.मु.नं.३००/२०२३**
**निशाण क्र.४३ ची पुरवणी**

**प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र. १ चा पुढील सरतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. डी.एम.सोनवणे यांचे तर्फे शपथेवर सुरू**

आता मला दाखविलेले खरेदी खत मौजे उमरड येथील गट नं. २८६ क्षेत्र ०१हे. ०७आर. चे खरेदी खत हे जमनाबाई दिगांबर करे यांनी मला दि. १५.०३.२००५ रोजी खरेदी खत क्र. १०४१/२००५ अन्वये करून दिल आहे. सदर खरेदीखतावर जमनाबाई यांचा अंगठा व घेणार म्हणून माझी सही तसेच साक्षीदार म्हणून दादा शिवा करे, साहेबराव जिवनराव मारकड, गौतम जयवंत बदे, महादेव शामराव ढाणे यांच्या सहया आहेत. आता मला दाखविलेले खरेदी खत तेच असून त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

सदर खरेदी खतास वादीने निशाण देण्यास हरकत नोंदविली.

प्रस्तुतचे खरेदी खत हे प्रतिवादी यांनी स्वत: केलेले असून प्रस्तुतची जमीन प्रतिवादी यांनी खरेदी केलेली आहे. करिता प्रतिवादी यांनी स्वत:चे खरेदी खत मान्य केले आहे. सबब वादीने नोंदविलेली हरकत फेटाळली आहे. सदर खरेदी खतास **निशाण क्र. ४५** देण्यात येत आहे.

आता मला दाखविलेले प्रतिज्ञापत्र हे जमनाबाई दिगांबर करे यांनी दि.२९. ०५.२००८ रोजी करून ठेवले होते.

**प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र. १ चा पुढील उलटतपास वादी तर्फे वकील श्री. डी.आर.देसाई यांचे तर्फे शपथेवर सुरू**

मी प्रस्तुत दाव्यात माझे तर्फे साक्षीदार तपसाणार आहे. परंतू मी त्यांची नावे मला आज सांगता येणार नाहीत. वादमिकतीचा गट नं.२८६ असून त्याचे संपूर्ण क्षेत्र १६हे. ४६आर. एवढे असलेबाबत मी सांगू शकत नाही. गट नं. २८६ च्या चतु:सिमा मी सांगू शकत नाही. गट नं.२८६ चा ७/१२ उतारा मी आजपर्यंत पाहिलेला नाही. गट नं. २८६ मध्ये एकूण २४ सहहिस्सेदार आहेत. त्यांच्या नोंदी ७/१२ पत्रकी नमुद आहेत.

दि.कि.अर्ज क्र. २२/२०१८ बाबत मी माझे कैफियतीमध्ये तसेच पुराव्याचे शपथपत्रात नमुद केलेले नाही. गट नं. २८६ मध्ये जे सहहिस्सेदार दर्शिविलेले आहेत त्यांचे वाटप झालेले आहे. सदरचे वाटप हे कसे झाले हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. २८६ मधील जमनाबाई करे यांना सदरची मिळकत ही शासना तर्फे मिळालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जमनाबाई करे यांचे पती हे युध्दात मयत झालेने सदरची मिळकत त्यांना शासनाने दिलेली होती, त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी पाहिलेला नव्हता. जमनाबाई यांना दावा मिळकती पैकी पश्चिमेकडील मधली पट्टी वहिवाटने करीता दिली होती ही बाब खरेदी खतात नमुद आहे. मी जमिन खरेदी करताना सदरची मिळकत ही पश्चिमेकडील मधली पट्टी असल्याबाबत महसुली कागदपत्रे मला मिळाली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, जमनाबाई करे ही वादीची सख्खी चुलती होती. जमनाबाई या खरेदी खताच्या वेळी वयोवृध्द होत्या परंतू त्या अशिक्षित असल्याबाब मला माहिती नाही. जमनाबाई या कागदपत्रावर अंगठा देत होत्या.

**रे.मु.नं.३००/२०२३**
**निशाण क्र.४३ ची पुरवणी**

दावा मिळकतीचे खरेदी खत झाले खरेदी खतामध्ये खरेदीची रक्कम किती नमुद केली आहे ते माझे लक्षात नाही. खरेदी खतावरील रक्कम मी माझे कैफियती मध्ये व खरेदी खता मध्ये नमुद केली नाही. सदर खरेदी खतातील नमुद रक्कम दुय्यम निबंधक करमाळा यांचेसमोर दिली नाही. खरेदी खतामध्ये नमुद रक्कम जमनाबाई यांना दिल्याबाबत रक्कम मिळालेची पावती घेतली नाही. तसेच त्यांना औषधपाण्याकरिता व उपजिवेकरिता किती रकमेची आवश्यकता आहे याबाबत मी चौकशी केली नाही. तसेच मी जमनाबाई यांना दिलेल्या रकमेचा तपशिल मी सांगू शकत नाही. मी जमनाबाई यांचेकडून दावा मिळकत खरेदी घेतली. सदर मिळकतीचा कब्जा मला मिळालेबाबत त्यांचेकडुन कब्जे पावती करून घेतलेली नाही. जमनाबाई या वयोवृध्द असल्याने त्यांना सदर जमिनीची मेहनत मशागत करता येत नसलेबाबत मला माहित नाही. सन २००५ सालापूर्वी जमनाबाई हिचे हिस्सेची मिळकत वादी वहिवाटत असलेबाबत मला माहिती नाही. मी दावा मिळकत खरेदी करण्यापूर्वी वादीस नोटीस पाठविली नाही. दावा मिळकत खरेदी करण्यापूर्वी मी जाहीर नोटीस वर्तमानपत्रात दिली नव्हती.

हे म्हणणे खरे नाही की, जमनाबाईच्या हयाती पासुन दावा मिळकत ही वादीच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी 'सरकार नियंत्रीत सत्ता' असा शेरा नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर बाबत मला दुय्यम निबंधक करमाळा यांनी कल्पना दिलेली होती. खरेदी खता मध्ये दावा मिळकत ही 'सरकार नियंत्रीत सत्ता' असे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २००५ सालापासुन आज पर्यंत दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी मालक म्हणून माझी नोंद झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खरेदी केलेली मिळकत ही बेकायदेशिर रित्या खरेदी केलेली असल्याने आज पर्यंत ७/१२ सदरी माझी मालक म्हणून नोंद झालेली नाही.

जमनाबाई यांना कोणतेही अपत्य नव्हते. जमनाबाईचा कायदेशिर वारस हा वादी असलेबाबत न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र वादीस मिळालेले आहे. वादीने जमनाबाई चा वारस असल्याबाबत न्यायालयातून घेतलेले वारस प्रमाणपत्र रद्द होवून मिळणेबाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागितलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर वारस प्रमाणपत्रा अधारे दावा मिळकतीस वादीची नोंद फेरफार क्र. ४१८० अन्वये झालेली आहे. सदर फेरफारची नोंद रद्द होणेकामी मी महसुल सदरी अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाचे कामकाज अद्याप चालु आहे. सदर अपिलाची कागदपत्रे मी न्यायालयात दाखल करू शकत नाही.

माझे खरेदी खताची नोंद ७/१२ सदरी झाले नसलेबाबत मी कामगार तलाठी यांना लेखी कळविले नव्हते. तलाठी यांनी खरेदी खता अन्वये माझे नाव ७/१२ सदरी माझी नोंद लावले नसल्याबाबत ची तक्रार मी महसुल सदरी मी नोंदविलेली नाही. मी शासनाची जमिन खरेदी करताना अनामत रक्कम शासनाकडे जमा करावी लागते ती रक्कम खरेदी खतापासुन आज पर्यंत शासनाकडे जमा केलेली नाही. जमनाबाई यांनी

**रे.मु.नं.३००/२०२३**
**निशाण क्र.४३ ची पुरवणी**

खरेदी खताबाबत प्रतिज्ञापत्र तहसिलदार यांचे समक्ष केले त्यामध्ये गट नं. २८६ पश्चिमेकडील मधली पट्टी ही नोंद केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जमनाबाई यांच्या प्रतिज्ञापत्रात गट नं.२८६ मधील पश्चिमेकडील मधली पट्टी अशी नोंद असलेबाबतचे खोटे सांगितले आहे. साक्षीदार स्वत: सांगतो की, खरेदी खतामध्ये तशी नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत पैकी पश्चिम बाजुची मधली पट्टी जमनाबाई यांचे ताब्यात कधीही नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, जमनाबाई या अशिक्षित असल्यामुळे त्यांना गट नंबर व चतु:सिमा यांची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८४ पासुन दावा मिळकत वादीच्या प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१९ मध्ये मी दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीस वादीस हरकत अडथळा केला. दावा मिळकती मध्ये माझा कायदेशिर कब्जा केंव्हाही नव्हता व नाही.

हे म्हणणे खरे नाही की, मी सेवानिवृत्त झाले पासुन मी माझे कुटुंबासह पुणे येथे राहत आहे. मी उमरड येथील रहिवाशी असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मिळकतीशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती मध्ये वादीचा वारसा हक्काने कायदेशिर कब्जा आहे. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटे साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण,
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

(एम.पी.एखे)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

दि.३१.०८.२०२४